सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठी राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील राज्यातील अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः राप्रधो- २०१९/प्र.क्र.५९/प्रशिक्षण

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- २० सप्टेंबर, २०१९

<u>वाचा -</u> १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमाक: राप्रधो ४२१५/(३८/१५)/प्रशिक्षण, दिनांक २४ जूलै, २०१७

२) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८ जूलै, २०१९

३) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे यांचे दिनांक २६/०६/२०१९ चे पत्र

<u>प्रस्तावना -</u>

राज्य प्रशिक्षण धोरणानुसार सन २०१९-२०या शैक्षणिक वर्षात शालेय शिक्षण विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण द्यावयाचे आहे. त्यासाठी विद्या प्राधिकरण, पुणे यांनी दिनांक २६/०६/२०१९ रोजी शासनाकडे प्रस्ताव केला. शासन निर्णय दिनांक २४ जूलै, २०१७ नुसार प्रशिक्षण स्थळ व प्रति प्रशिक्षणार्थी शुल्क निश्चित केले आहे. या प्रशिक्षणांतर्गत एकूण १००० प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणावरील येणारा खर्च भागविण्यासाठी रु. १,०६,८३,०००/- इतकी तरतुद मंजूर करणे व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे

<u>शासन निर्णय -</u>

शालेय शिक्षण विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी सन २०१९-२० या वित्तीय वर्षात एकूण रु. २.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीय करण्यात आली आहे. वित्त विभाग शासन परिपत्रक दिनांक ०८ जूलै, २०१९ अन्वये वित्त विभागाने एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ६०% च्या मर्यादेत निधी वितरीत करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार, या विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या प्रशिक्षणासाठी येणाऱ्या रु. १,०६,८३,०००/- इतक्या खर्चास शासन मंजूरी देण्यात येत आहे. सदर खर्च मुख्य लेखाशीर्ष, २२५१, सचिवालयीन - सामाजिक सेवा या खालील (००) (०१) शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण (कार्यक्रम) (२२५११००२) या संकेतांकाखालील ५०, इतर खर्च या उद्दिष्टाखाली खर्ची टाकण्यात यावा. तसेच यासंदर्भात याविभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या तसेच वित्त विभागाने दिनांक ०८ जूलै, २०१९ रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या निदेशांचे काळजीपूर्वक पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९२११६३३५१२८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY
DATTATRAY MANE

Digitally signed by SANJAY DATTATRAY MANE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=7322cf22539d1c2a9ec41d18debd6a1b1822daa203eedff083386e6f6686c0f5, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI,
serialNumber=cc816238ed3c914e2fa2e99da4bc0ba4e1f6947aa23ad145e3dc6a469041090f, ou=SPORTS EDUCATION AND SPORTS DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY DATTATRAY MANE
Date: 2019.09.21 16:27:11 +05'30'

(संजय माने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मंत्री शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
३. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्या प्राधिकरण) पुणे
६ महालेखापाल (लेखा परिक्षा), १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१/२), मुंबई/नागपूर
८. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-६३
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक (शालेय विभाग)
११.वित्त विभाग (व्यय-५/अर्थसंकल्प-८), मंत्रालय, मुंबई.
१२.निवडनस्ती (प्रशिक्षण).